# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ- ९, बिडको नाका रोड,माहिम, ता.जि. पालघर
दुरध्वनी. क्र.०२५२५-२५३१११ Email ID :- Collectorpalghar@gmail.com

**क्र/महसूल/कक्ष-१/टे-जमीनबाब /कांदळवन/कावि-२८४/२०२०** **दिनांक:- ०९/११/२०२०**

**प्रति,**
**मा.सदस्य सचिव,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष,मुंबई.**

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 430
दिनांक 12/02/2021
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक

**विषय** :- मौजे-वडकून,ता.डहाणू,जि.पालघर येथे कांदळवन क्षेत्रात कोळंबी प्रकल्प चालू असलेबाबत...
कांदळवन तक्रार क्र.१२८ - तक्रारदार समर्थन लाईव्ह

**संदर्भ** :- १)आपलेकडील पत्र क्र.ल.ले./०४/सन २०२०-२१, दि.१७/०७/२०२०
२) उपविभागीय अधिकारी डहाणू यांच्याकडील पत्र क्र.डीपी/जमिनबाब/कावि-४७०, दि.२३/१०/२०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मौजे- वडकून, ता.डहाणू , जि.पालघर येथे कांदळवन क्षेत्रात कोळंबी प्रकल्प चालू असल्याबाबत समर्थन लाईव्ह यांनी तक्रार केली असून, सदर तक्रारीचे अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत आपलेकडील वरील संदर्भीय अ. क्र. ०१ च्या पत्रान्वये कळविले होते.

Steno mangrove committee

सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी डहाणू यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली असून, मौजे- वडकून, ता.डहाणू , जि.पालघर येथील ग.नं. २३४/१ क्षेत्र ३५२.८६.० हे.आर. या जमिनीच्या कब्जेदार सदरी बिन आकारी पडीत अशी नोंद आहे. सदर जमनीमध्ये सन २००२ पासून एकुण १० कोळंबी भाडेपट्टाधारकांना कोळंबी व मिठागरे प्रयोजनार्थ परवानगी देण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | ग.नं. | कब्जेदार सदरी नोंद | क्षेत्र | इतर हक्क सदरी कोळंबीसाठी भाडेपट्टयाने दिलेल्या व्यक्तींची नावे | भाडेपट्टयाने दिलेले क्षेत्र (हे.आर.) | प्रयोजन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २३४/१ | बिन आकारी पड | ३५२.८६.० | आत्माराम नवसू बारी | ५.००.० | कोळंबी |
| २ | | | | महेश शुक्ला माच्छी | ५.००.० | कोळंबी |
| ३ | | | | गिता शशिकांत बारी | ३.००.० | कोळंबी |
| ४ | | | | शशिकांत गंगाराम बारी | ५.००.० | कोळंबी |
| ५ | | | | अमित शशिकांत बारी | ३.००.० | कोळंबी |
| ६ | | | | महाराष्ट्र सॉल्ट मॅन्युफॅक्चरींग सोपारा | ५०.००.० | मिठागरे |
| ७ | | | | काशिनाथ महेश माच्छी | ५.००.० | कोळंबी |
| ८ | | | | महाविर शिनवार माच्छी (१५%), बहादू मिनूभामगारा (४२.५%), माणिक मिनू भामगारा (४२.५%) | ३१.०४.० | कोळंबी |
| ९ | | | | नाखुदा सॉल्ट वर्क्स तर्फे श्री.तेजराज धिसूलाल जैन व इतर ७ | ५०.००.० | मिठागरे |
| १० | | | | मे.सुपर फार्मा ॲक्वाकल्चर प्रा.लि. | ५.००.० | कोळंबी |

D:\Dinesh Patil\Kandalvan\Vadakun T No.11.docx

वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे सुमारे १६३.००.० हे.आर. जमिन कोळंबी प्रकल्प व मिठागरे प्रयोजनार्थ दिलेली असून उर्वरीत जमिन ही खाडी व खांजण स्वरुपाची आहे. सदर जागेमध्ये भाडेपट्टा कोळंबी प्रकल्प व मिठागरे असून अंदाजे काही प्रकल्प २५ ते ३० वर्षापासूनचे आहे. आजरोजी सदर जागेवर कोळंबी प्रकल्प चालू आहेत. नव्याने तलाव तयार केलेले नाही. आजरोजी जागेवर तिवरीच्या झाडाची तोड झालेली दिसून आलेली नाही. काही ठिकाणी खाडी व खांजण स्वरुपाची जमिन असल्याने पाहणी करण्यात अडथळा येतो. प्रकरणी कोळंबी प्रकल्पांना भेटी दिल्या असता कोळंबीचे तलाव हे जुनेच असल्याने पुर्वी तिवरीच्या झाडांची तोड झाली अथवा नाही हे आजरोजी सांगणे अशक्य असल्याचे त्यांनी त्यांचेकडील संदर्भाधिन पत्र क्र. ०२ अन्वये अहवाल सादर केलेला आहे. **तसेच सन २००९ नंतर या जिल्ह्यात कोळंबी संवर्धनाकरीता शासकीय जमिन दिल्याचे दिसुन येत नाही.**

सोबत उपविभागीय अधिकारी डहाणू यांचेकडील संदर्भाधिन अ.क्र.०२ च्या अहवालाची छायांकित प्रत जोडली आहे. तरी सदर तक्रार आपले स्तरावरुन निकाली काढण्यास विनंती आहे.

**(डॉ किरण महाजन)**
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय पालघर**

स्थळ प्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे

महाराष्ट्र शासन

# उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी, डहाणू विभाग डहाणू यांचे कार्यालय

डहाणू-आगररोड, कॉटेज हॉस्पिटल जवळ, आगर-डहाणू,
ता. डहाणू, जि. पालघर - पिन कोड क्र. 401601

दुरध्वनी क्र. - 02528/222231
फॅक्स क्र. - 02528/222231

Email-ID - sdodahanu@gmail.com

क्र. डॉपी/जमिनबाव/कावि - ४७०
दि. २३/१०/२०२०.

प्रति,

मा.जिल्हाधिकारी पालघर
(महसूल शाखा)

विषय :- मा.उच्च न्यायालयाचे रिट याचिका क्र.३२४६/२००४ रुपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६

---

कांदळवन क्षेत्रामध्ये कोळंबी प्रकल्प सुरु केलेबाबत...

संदर्भ:- १.आपलेकडील पत्र क्र.महसूल/कक्ष-१/टे-जमीनबाब/कावि-२८४/२०२० दि.२५/०७/२०२०
२. तहसिलदार डहाणू यांचेकडील पत्र क्र.महसूल/ जमिनबाब/ कांदळवन तक्रार क्र.१४/कावि-७९२/२०२ दि. १४/१०/२०२०

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करणेत येते की, तक्रारदार समर्थन लाईव्ह यांनी Google Earth Image आणि MRSAC नकाशावरुन मौजे वडकून येथील महसूल विभागाचे नियंत्रण असलेल्या कांदळवन क्षेत्रामध्ये अनधिकृत कोळंबी प्रकल्प कार्यरत असल्याचे कांदळवन नष्ट होत असून सदर ठिकाणी आता विरळ प्रमाणात कांदळवन असल्याबाबत केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करणेबाबत आपलेकडील संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये कळविणेत आले होते.

त्याअनुषगांने सदर प्रकरणी तहसिलदार डहाणू यांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पोलीस विभाग, वन विभाग, उप अधिक्षक भूमि अभिलेख यांच्या समवेत स्थळपाहणी करुन अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले होते त्याअनुषंगाने तहसिलदार डहाणू यांनी संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे. " सदर दिवशी भूकरमापक, उपअधिक्षक भूमी अभिलेख डहाणू, वनपरिमंडळ अधिकारी कैनाड, मंडळ अधिकारी मल्याण व तलाठी सजा मल्याण हे उपस्थित होते. सदर पथकाने अहवाल सादर केला आहे. त्याअनुषंगाने मौजे वडकून येथील ग.नं. २३४/१ क्षेत्र ३५२.८६.० हे.आर या जमिनीच्या कब्जेदार सदरी बिन आकारी पडीत अशी नोंद आहे. सदर जमनीमध्ये सन २००२ पासून एकुण १० कोळंबी भाडेपट्टाधारकांना कोळंबी प्रयोजनार्थ परवानगी देण्यात आलेली आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | ग.नं. | कब्जेदार सदरी नोंद | क्षेत्र | इतर हक्क सदरी कोळंबीसाठी भाडेपट्टयाने दिलेल्या व्यक्तींची नावे | भाडेपट्टयाने दिलेले क्षेत्र (हे.आर) | प्रयोजन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २३४/१ | ३५२.८६.० | बिन आकारी पडीत | आत्माराम नवसू बारी | ५.००.० | कोळंबी |
| २ | | | | महेश शुक्ला माच्छी | ५.००.० | कोळंबी |
| ३ | | | | गिता शशिकांत बारी | ३.००.० | कोळंबी |
| ४ | | | | शशिकांत गंगाराम बारी | ५.००.० | कोळंबी |
| ५ | | | | अमित शशिकांत बारी | ३.००.० | कोळंबी |
| ६ | | | | महाराष्ट्र सॉल्ट मॅन्युफॅक्चरींग सोपारा | ५०.००.० | मिठागरे |
| ७ | | | | काशिनाथ महेश माच्छी | ५.००.० | कोळंबी |
| ८ | | | | महाविर शिनवार माच्छी १५% बहादू मिनूभामगारा ४२.५% माणिक मिनू भामगारा ४२.५% | ३१.०४.० | कोळंबी |
| ९ | | | | नाखुदा सॉल्ट वर्क्स तर्फे तेजराज धिसूलाल जैन, सुरेश धिसूलाल जैन, नितीन धिसूला जैन, शकुंतला पारस जैन, भावेश पारस जैन, गौरव पारस जैन, मिना महेंद्र बाफना, मोनिका राजेश, मिथुन राजेश | ५०.००.० | मिठागरे |
| १० | | | | मे. सुपर फार्मा ॲक्वाकल्चर प्रा.लि. | ५.००.० | कोळंबी |

Scanned with CamScanner

वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे सुमारे १६३.००.० हे.आर जमिन कोळंबी प्रकल्प व मिठागर प्रयनाजनार्थ दिलेली असून उर्वरीत जमिन ही खाडी व खांजण स्वरुपाची आहे. सदर जागेमध्ये भाडेपट्टा कोळंबी प्रकल्प व मिठागरे असून अंदाजे काही प्रकल्प २५-३० वर्षापासूनचे आहे. आजरोजी सदर जागेवर कोळंबी प्रकल्प चालू आहेत. नव्याने तलाव तयार केलेले नाही.सबब आजरोजी जागेवर तीवरींच्या झाडांची तोड झालेली दिसून आली नाही. नव्याने झाडांची तोड झालेली नाही. काही ठिकाणी खाडी व खांजण स्वरुपाची जमिन असल्याने पाहणी करण्यात अडथळा येतो. प्रकरणी कोळंबी प्रकल्पांना भेटी दिल्या असता कोळंबीचे तलाव हे जुनीच असल्याने पूर्वी तिवरींच्या झाडांची तोड झाली आहे अथवा नाही हे आजरोजी सांगणे अशक्य आहे." अशाप्रकारचा अहवाल प्राप्त झाला आहे.

तरी सदरचा अहवाल सोबत जोडून आपणाकडे माहितीस्तव आणि पूढील कार्यवाहीस्तव सादर करीत आहोत.

(आशिमा मित्तल)
सहाय्यक जिल्हाधिकारी
डहाणू विभाग डहाणू

Scanned with CamScanner